## पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

**सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही वॉच) या संकल्पने अंतर्गत येरवडा परिसरातील आस्थापना, कार्यालये, एटीएम सेंटर यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन केले.**

---

सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही वॉच) या संकल्पने अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.१८/०७/२०१९ रोजी सकाळी १५:०० वा. ते १५:५५ वा.चे दरम्यान येरवडा भागातील व्यापारी आस्थापना, एटीएम सेंटर, कार्यालये यांना भेटी देवून त्यांना सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही वॉच) या संकल्पनेची माहिती देऊन घडणारे चोरी, जबरी चोरी, घरफोडी, फसवणूक इत्यादी गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे महत्व समजावून सांगितले. तसेच सदर आस्थापना धारकांना त्यांचे आस्थापनेमध्ये तसेच बाहेरील रस्ता, परिसर कव्हर होईल अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून त्यांना तशी लेखी पत्र अदा केली आहेत.

अशा प्रकारे श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही वॉच) या संकल्पने अंतर्गत येरवडा, पुणे परिसरातील व्यापारी आस्थापना, एटीएम, कार्यालये यांना सुरक्षेबाबत माहिती देवून सीसीटीव्ही कॅमरे बसविणेबाबत आवाहन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे








